<महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या पदांच्या आरक्षणाबाबत.>

महाराष्ट्र शासन

ग्रामविकासविभाग

शासन परिपत्रक क्रमांकः मजिअ-२०१३/प्र. क्र. ११६/योजना-३

२५, बांधकाम भवन, मर्झबान रोड, मुंबई - ४०० ००१

तारीख: ९ मे, २०१३

वाचा :

१) शासननिर्णयक्रमांकःएनआरएलएम २०११/प्र. क्र.१९६/योजना-३, दिनांक १८ जुलै, २०११.

२) शासननिर्णयक्रमांकःएनआरएलएम २०१२/प्र. क्र.४२/योजना-३,दिनांक ३१मार्च,२०१२.

३) शासननिर्णयक्रमांकःमजिअ२०१३/प्र. क्र. ३६/योजना-३, दिनांक २० मार्च,२०१३.

परिपत्रक—

महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत मंजूर करण्यात आलेल्या कंत्राटी तत्वावरील पदांची भरती करतांना महाराष्ट्र राज्य लोकसेवा अनुसूचित जाती, अनूसुचित जमाती, निराधिसुचित जमाती (विमुक्त जाती), भटक्या जमाती, विशेष मागास प्रवर्ग आणि इतर मागास वर्ग यांच्यासाठी आरक्षण अधिानियम, २००१ (सन २००४ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.८) मधील तरतूदीनुसार कार्यवाही करण्यात यावी.

२. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत राज्य अभियान कक्ष हा नियुक्ती प्राधिकरण म्हणून घोषित करण्यात येत असून जिल्हा / पंचायत समिती / क्लस्टर स्तरावर पदांच्या संदर्भात राज्य अभियान कक्षाच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा अभियान प्रमुख हे नियुक्ती प्राधिकरणाचे काम पाहतील. जिल्हा स्तरावर नियुक्ती करतांना जर आरक्षणाची पदे भरण्यासाठी विहित प्रयत्नानंतर सक्षम उमेदवार प्राप्त झाला नाही तर राज्य अभियान कक्षाने अशा आरक्षित पदांकरिता राज्य

स्तरावरून भरती प्रक्रियेचा अवलंब करुन सक्षम उमेदवारांची नियुक्ती करावी. म्हणजे अभियानाची अंमलबजावणी करण्यास विलंब होणार नाही.

३. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत करण्यात येणाऱ्या भरती प्रक्रियेत महिलांना राज्य, जिल्हा, तालुका व क्लस्टर स्तरावरील पदांमध्ये ३०% आरक्षण असावे व अभियानाच्या कामासाठी एरिया कोऑरडीनेटर या पदांना महिलांची आवश्यकता असल्याने ही पदे १००% महिला संवर्गातून भरण्यात यावी.

४. महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियानांतर्गत आरक्षण प्रभावीपणे लागू करण्याकरिता विशिष्ट प्रवर्गातील उमेदवार प्राप्त होण्यासाठी विविध शैक्षणिक संस्था, अनुसूचित जाती/जमातीसाठी काम करणाऱ्या स्वयंसेवी संस्थांचे सहकार्य घेण्यात यावे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१३०५१६१२३८३८४१२० असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Gite Naresh Bhagwanrao

Digitally signed by Gite Naresh Bhagwanrao
DN: CN = Gite Naresh Bhagwanrao, C = IN, S = Maharashtra, O = Government Of Maharashtra, OU = RDD
Reason: I am approving this document
Date: 2013.05.21 15:37:07 +05'30'

**डॉ. नरेश गिते**

उप सचिव, महाराष्ट्र शासन

प्रत,

१) मुख्य कार्यकारी अधिकारी, महाराष्ट्र राज्य ग्रामीण जीवनोन्नती अभियान, बेलापूर,

२) मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद तथा अध्यक्ष, जिल्हा अभियान कक्ष, (सर्व)

३) जिल्हाधिकारी (सर्व)

४) प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, (सर्व)

५) उपसचिव (कार्यासन १६-ब),सामान्य प्रशासन विभाग, मंत्रालय मुंबई,

६) मा.मंत्री, ग्रामविकास,  यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

७) मा.राज्यमंत्री, ग्रामविकास, यांचे खाजगी सचिव, मंत्रालय, मुंबई.

------